# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-४४** **दिनांक - १४/०२/२०२४**

## नायगाव गुन्हेप्रकटिकरण शाखेकडुन गांजा विक्री करणारे दोन आरोपी अटक

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०७/०२/२०२४ रोजी नायगाव पोलीस ठाण्याचे हजर असतांना पोशि/संतोष घुगे यांना नायगाव पुर्व म्हात्रेवाडी येथुन जाणा-या रोडच्या लगत,स्टारसिटी लगत नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर दोन इसम गांजा नावाचा अंमली पदार्थ विक्रीकरीता येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर कारवाई करणेबाबत मा.पोलीस उप आयुक्त यांनी आदेश दिल्याने वपोनि/ रमेश भामे तसेच पोलीस निरीक्षक सागर टिळेकर व गुन्हे प्रकटिकरण अधिकारी व अंमलदार यांचेसह कारवाई करणेकामी टिम तयार करुन म्हात्रेवाडी येथुन जाणा-या रोडच्या लगत,स्टारसिटी लगत नायगाव पुर्व ता.वसई जि.पालघर या परीसरात कोणाला ओळखू येणार नाही अशा पध्दतीने सापळा रचून थांबुन राहीलो. त्यानंतर १५.५५ वा.च्या सुमारास एक बॅर्गमन मोटारसायकल वरुन दोन इसम सदर ठिकाणी आले असता त्यावेळी आमच्या गुप्तबातमीदार याने सदरचा इसम हे तिच असल्याचे सांगुन तो निघुन गेला. वरीष्ठांचे इशा-यावरुन सदर इसमास सापळा लावलेल्या पोलीसांनी ताब्यात घेतले सदर आरोपी नामे यांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव व पत्ता विचारले असता १) सलमान मोईज खान वय-२४ वर्षे, व्यवसाय-चालक राहणार-रुम नं ००३, वेल्फेअर सोसायटी,धचकुलपाडा, तयाबानगर, काशीमिरा, ठाणे व २) इद्रीस मलम वस्ताद, वय-३७ वर्षे,व्यवसाय-नोकरी राहणार- तळमजला, कमर पॅराडाईज, शमस मजिस्दच्या पाठीमागे, नयानगर मिरारोड पुर्व ठाणे यांच्या बॅर्गमन स्कुटरच्या सीटच्या खाली चेक असता सदर स्कुटरच्या सीटच्या खाली १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा गांजा एकुण ३९,८०० /- **रुपये** किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ बेकायदेशीर बाळगत असतांना मिळुन आला. तसेच सदर गुन्हयात करीत असताना वापरण्यात आलेला बॅर्गमन स्कुटर व आरोपीत यांचा मोबाईल अशा एकुण १०६,८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर बाबत नायगाव पोलीस ठाणे गु.रजि.नं.७५/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क),२० (ब),ाा(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कामगीरी श्रीमती पोर्णिमा चौगुले, पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ - २ वसई, श्रीमती पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, वसई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रमेश भामे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) सागर टिळेकर, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, स.पो.नि. गणेश केकान, रोशन देवरे, विनोद वाघ, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम.सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार,चेतन ठाकरे, अशोक पाटील,संतोष घुगे व भारत राठोड यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.